राज्यातील खाजगी आणि सार्वजनिक कंपन्या तसेच वित्तीय संस्था यांचा कंपनी सामाजिक दायित्वाच्या (सीएसआर) माध्यमातून सक्रीय पाठींबा आणि सहभाग मिळविण्याच्या अनुषंगाने दिनांक ०८/०१/२०१६ रोजी राजभवन येथील कार्यक्रम.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएलबीसी १६१५/१३१/प्र.क्र.१००/का.१४१७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ०६ जानेवारी, २०१६

वाचा - शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५

प्रस्तावना

राज्यातील खाजगी आणि सार्वजनिक कंपन्या तसेच वित्तीय संस्था यांचा कंपनी सामाजिक दायित्वाच्या (सीएसआर) माध्यमातून शासनाच्या योजनांसाठी सक्रीय पाठींबा आणि सहभाग मिळविण्याच्या अनुषंगाने शुक्रवार, दिनांक ०८/०१/२०१६ रोजी मा.राज्यपाल महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे शासनातर्फे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

शासन निर्णय

सदर कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन मा.राज्यपाल यांचे कार्यालयाच्या सूचनेस अनुषंगाने राजभवन परिसरात करण्यात येणार आहे. मुख्य कार्यक्रमाचे आयोजन दरबार हॉल येथे करण्यात येत आहे. उपस्थित मान्यवरांसाठी भोजन व्यवस्था दरबार हॉल शेजारील हिरवळीवर (लॉन) करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने होणारा सजावट खर्च, भोजन व्यवस्था खर्च, लॉन वरील खास बैठक व्यवस्था खर्च व छपाई खर्च इत्यादींसाठी नियमानुसार दरपत्रके मागविण्यात आली होती. प्राप्त दरपत्रकात नमूद बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र सेवा पुरवठादारांकडून सेवा घेण्याचे निश्चित केले आहे. यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :-

एकत्रित बाब निहाय खर्च			
अ.क्र.	**बाब**	**सेवा पुरवठादाराचे नाव**	**प्राप्त दरपत्रक रक्कम (सर्व करांसहित) रुपयांत**
१	सजावट खर्च	टी.एल.जी. इंडिया प्रा.लि.	२,९५,९८३/-
२	भोजन व्यवस्था	डीलक्स केटरर्स प्रा.लि.	२,९८,५००/-
३	लॉन वरील खास बैठक व्यवस्था	फ्लोरल स्टीम्स्	१,७१,०००/-
४	छपाई खर्च	अमृत झेरॉक्स ॲन्ड स्टेशनर्स	१,८७,४२५/-
	एकूण		**९,५२,९०८/-**

(रुपये नऊ लाख बावन्न हजार नऊशे आठ फक्त)

२. उपरोक्त प्रयोजनावरील खर्च मागणी क्र.ओ-७, लेखाशीर्ष “३४५१ सचिवालय आर्थिक सेवा, ०९० सचिवालय (०१) (०३) नियोजन विभाग योजनांतर्गत (३४५१ ०५०२) १३ कार्यालयीन खर्च व १७

संगणक खर्च" याखाली सन २०१५-१६ या चालू वित्तीय वर्षी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरहू निधी उपरोक्त लेखाशीर्षाखाली आहरित व संवितरीत करण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून श्रीमती अ.र.पाटील, उप सचिव व आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्रीमती रोहिणी कुलकर्णी, कार्यासन अधिकारी यांना घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या परिशिष्टातील भाग पहिला उपविभाग ३, अ.क्र.४, २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अपर मुख्य सचिव (नियोजन) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०४१४४८५२०२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Priyanka Ranjan Chhapwale

Digitally signed by Priyanka Ranjan Chhapwale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=55fdd77fa8877b50fd182206f763c590c30ce698809f79d37b145fd63e375059, cn=Priyanka Ranjan Chhapwale
Date: 2016.01.06 15:31:24 +05'30'

(प्रियांका रं. छापवाले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १, मुंबई
२. महालेखापाल, लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र २, नागपूर.
३. निवासी लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. वित्त विभाग, कार्यासन व्यय-८, अर्थसंकल्प-१६, विनियम, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
७. उप सचिव (रोखशाखा), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी, नियोजन विभाग, कार्यासन १४११, १४२१, १४२२, १४२४ मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती.